REGISTERED No. B. 3434


**अर्थ**

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार,
इत्यादि विषयांस वाहिलेलें साप्ताहिक.

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.

*वर्गणीचे दर :*

वार्षिक : ६ रु. सहामाही : ३ रु.

किरकोळ अंक : २ आ.

*जाहिरातीचे दर :*

करारच्या व इतर अटी जाहिरातखात्याकडून मागवाव्यात.
चेक, मनिऑर्डरी, इ. पाठविण्याचा पत्ताः–

"अर्थ"
"*दुर्गाधिवास*" पुणें ४.


# अर्थ

*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र*


वर्ष १६ | पुणें. बुधवार तारीख २६ एप्रिल, १९५० | अंक १७



फोनः ३४५१९ तारः SAHYOG

## दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई १.

उत्पादकांच्या ( प्रोड्यूसर्स ) सोसायट्यांना
असोसिएशन खालील मालाचा पुरवठा करतेः–

सूत, रसायनें, रंग, कच्चीं कातडीं व चामडीं,
कातडीं कमाविण्यास लागणारा माल,
कमावलेलें कातडें, इ., मशीन.
टूल्स आणि इक्विपमेंट इ.

आणि

खालील मालाच्या विक्रीस सहाय्य करतेः —

हातमागावरील कापड ( सुती व लोंकरी ), धातूचें
सामान, चंदनी लांकूड, रोजवुड आणि हस्तिदंती
आर्टस अँड क्रॅफ्टस, रेशीम, जर, कातडीं व
कातडी माल, खाद्य तेलें, लाकूड आणि
कोळसा वगैरे.



दी

## बँक ऑफ कोल्हापूर, लि.

एच. एच. दी छत्रपति महाराजा ऑफ कोल्हापूर यांचे
सरकारचे आश्रयाखालील व त्यांचा फार मोठा
पाठिंबा मिळत असलेली.

*[ कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची
जबाबदारी मर्यादित असलेली. ]*

स्थापनाः १९२६.

मुख्य कचेरी :
सर बर्डवुड रोड, लक्ष्मीपुरी, कोल्हापूर.

तार : BANKOP फोन : २८९


| | |
|---|---|
| आधिकृत भांडवल | ४०,०६,५०० रु. |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | २०,२६,००० रु. |
| वसूल | १०,१३,००० रु. |
| रिझर्व्ह फंड | ७,८६,००० रु. |
| खेळतें भांडवल | २,८८,००,००० रु. हून अधिक |

शाखा :
(१) गुजरी (२) शाहुपुरी–कोल्हापूर (३) मलकापूर
(४) पेठ वडगांव (५) जयसिंगपूर (६) इचलकरंजी
(७) गडहिंग्लज (८) निपाणी (जि. बेळगांव) (९) मुंबई–
फोर्ट–(१०) मुंबई–मांडवी.

—बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात—
मुख्य कचेरींत सेफ डिपॉझिट लॉकर्सची
उत्तम व्यवस्था.

व्ही. ए. सावंत, जनरल मॅनेजर.






## देशी धंद्यास उत्तेजन द्या.

१ तांदुळाची गिरणी २ डाळीची गिरणी ३ उसाचे चरक
४ चक्क्या ५ गोल करवत (लाकडें कापण्याकरितां) ६ टूल ग्राइंडर्स
व इतर ओतीव काम तयार करणार.

जी. जी. दांडेकर मशिन
वर्क्स लिमिटेड

भिवंडी जि. ठाणें
व्हाया–कल्याण ( जी. आय. पी. रेल्वे )



# पांच हॉर्स पावरचें डिझेल एंजीन

घ्यावयाचें म्हणजे तें किर्लोस्कर पीटरच ! संपूर्ण पंपिंग सेटही मिळेल. चौकशी करा.

**केळकर बंधु, बुधवार चौक, पुणें शहर.**


## विविध माहिती

**भाताच्या लागवडीखालील जमीन**—१९४९-५० सालीं भारतांत ६,५९,६२,००० एकर जमिनींत भाताची लागवड करण्यांत आली होती असा अंदाज करण्यांत आला आहे. १९४८-४९ सालीं हें क्षेत्र ६,३२,४७,००० एकर होतें. भाताची अधिक लागवड झालेल्या प्रांतांत मुंबई प्रांतहि आहे. कांहीं ठिकाणीं भाताच्या लागवडीला अनुकूल हवामान लाभल्यानें आणि सरकारच्या अधिक धान्य पिकविण्याच्या मोहिमेमुळें लागवडीच्या क्षेत्रांत वाढ झालेली आहे. १९४८ ला पूर्ण झालेल्या तीन वर्षांच्या अवधींत दर एकरीं सरासरी ६९७ पौंड तांदूळ निर्माण झाला.

**चिनी नभोवाणी पांच भाषा वापरणार**—नव्या चीनची राजधानी पेकिंग, येथील नभोवाणीवरून पांच भाषांतून वृत्त आणि माहिती सांगण्यांत येणार आहे. ह्या भाषा पुढील प्रमाणें आहेत:-जपानी, इंडोनेशिअन, व्हिएट नामीण, सयामी आणि ब्रह्मी. आग्नेय आशिआंतील सध्याची अस्थिर परिस्थिती लक्षांत घेतां ह्या प्रचारमोहिमेला विशेष महत्त्व प्राप्त झालें आहे.

**चीनची प्रगति झपाट्यानें होणार**—कँटरबरीचे डीन डॉ. ह्यूलेट जॉन्सन सध्या ऑस्ट्रेलिआच्या दौऱ्यावर आहेत. ऑस्ट्रेलिआंत एका प्रसंगीं भाषण करतांना ते म्हणाले कीं कम्युनिस्ट चीनची प्रगति रशिआ इतकीच त्वरेनें होईल. कदाचित् ती रशिआपेक्षा अधिक वेगानें होईल. रशिआ चीनला औद्योगिक यंत्रसाहित्य आणि तज्ज्ञ ह्यांची जी मदत करीत आहे तीवरच डीन साहेबांचा अंदाज बांधलेला असावा.

**जपानमध्ये भारतीय बोलपट**—जपानच्या सरकारनें मेसर्स सेन अँड ब्रदर्स ह्या कंपनीला तीन हिंदी बोलपट जपानमध्यें दाखविण्यास परवानगी दिली आहे. पुढील वर्षीं ६ हिंदी चित्रपटांना परवानगी मिळेल अशी कंपनीची अपेक्षा आहे. जपानमध्यें भारतीय बोलपट दाखविले जाण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे.

**बँकांच्या नोकरवर्गाची मागणी**—ऑल इंडिआ रिझर्व्ह बँक एम्प्लॉइज असोसिएशनचें वार्षिक अधिवेशन कलकत्ता येथें भरलें होतें. बँकांतील नोकरांना नोकरीची शाश्वती वाटावी, बँकेजवळील पैसे सुरक्षित ऱ्हावे आणि त्या पैशाचा देशाच्या उत्कर्षासाठीं अधिक चांगल्या तऱ्हेनें उपयोग व्हावा म्हणून बँकिंगच्या धंद्याचें राष्ट्रीयीकरण करण्यांत यावें असा ठराव परिषदेंत मंजूर करण्यांत आला.

**उत्तर प्रदेशांत ५०,००० महारोगी**—उत्तर प्रदेशांत संसर्गजन्य महारोगानें पछाडलेले ५०,००० रोगी असून त्यांपैकीं १०,००० रोग्यांना शुश्रूषागृहांत ठेवणें जरूर आहे, अशी माहिती त्या राज्याच्या आरोग्यमंत्र्यांनीं सांगितली.

**जपानी कृत्रिम रेशमाची आयात**—भारत सरकारनें १७५ लाख रुपये किंमतीचें जपानी कृत्रिम रेशीम आयात करण्यास परवानगी दिली आहे असें समजतें. इतक्या रकमेला ६२,००,००० पौंड कृत्रिम रेशीम मिळूं शकेल असा अंदाज आहे. जपानच्या ह्या धंद्यांतील एक महिन्याचें उत्पादन सरासरी इतकेंच आहे.

**कापसाची कमाल किंमत वाढवा**—भारतांतील भुईमूग, तंबाखू, गहूं आणि तांदूळ ह्यांचे घाऊक किंमतीचे निर्देशांक अनुक्रमें ६६२,७६८,५०२ आणि ४७६ आहेत. कापसाचा निर्देशांक मात्र ४२३ आहे. त्यामुळें कापसाचें उत्पादन घटलें आणि परदेशी कापसाच्या निर्यातीवर अवलंबून रहावें लागलें असें मत इंडिअन सेंट्रल कॉटन कमिटीचे उपाध्यक्ष श्री. आर. जी. सरय्या ह्यांनीं व्यक्त केलें आहे. कापसाची किंमत वाढविणें जरूर असून तसें केल्यानें परदेशीय बाजारपेठांत भारताचें कापड किंमतीच्या स्पर्धेत न टिकण्याचा धोका नाहीं. कापसाचा बाजार खुला ठेवून व कमाल किंमती ठरवून सरकारनें कापसाच्या काळ्या बाजाराला कायदेशीर मान्यताच दिली आहे, अशी टीका त्यांनीं केली आहे.

**लेबलांचा डोईजड खर्च**—आस्ट्रेलिआंतील पूर्वीच्या सरकारनें कापडाबाबत एक कायदा मंजूर केला होता. ह्या कायद्यान्वयें देशांत तयार झालेल्या अगर आयात करण्यांत आलेल्या कापडावर त्यांत वापरलेल्या सुताचें लेबल लावण्याची सक्ति करण्यांत येणार होती. हा कायदा अंमलांत आल्यास ऑस्ट्रेलिआच्या जनतेला कापडासाठीं ३०,००,००० ऑस्ट्रेलिअन पौंड जादा द्यावे लागले असते. कायदा अंमलांत आणूं नये म्हणून कापड कारखानदारांनीं सरकारला विनंति केली आहे.

**रबराच्या पातीचा पंखा**—जनरल इलेक्ट्रिक कंपनीनें टेबलावरील पंख्यांचा एक नवीन प्रकार काढला आहे. ह्या पंख्यांतील फिरत्या पाती रबराच्या बनविण्यांत आल्या आहेत. पातींना अशा तऱ्हेचें वळण देण्यांत आलें आहे कीं त्या धातूच्या पातीप्रमाणेंच ताठ रहाव्या. ह्या पंख्यांत चुकून हात सांपडला तरी तो दुखावण्याची भीति नाहीं.

**प्रीमिअर कन्स्ट्रक्शन कं., लि.**—ह्या कंपनीला १९४९ सालीं ६,५६,८९९ रुपयांचा नफा झाला. १९४८ सालीं कंपनीला ७,१४, ११३ रुपये नफा झाला होता. कंपनीच्या चालकांनीं ४ टक्के नफा चालूं ठेवण्याचें ठरविलें आहे. कंपनीच्या अधिकारांत असलेल्या इतर कंपन्यांतून कंपनीचें १,४६,३६, २२१ रुपये भांडवल गुंतलेलें आहे.

**ऑस्ट्रेलिआंत तेलाचा शोध**—शेल ऑईल कंपनीनें ऑस्ट्रेलिआंतील क्वीन्सलंड ह्या उपराज्यांत खनिज तेलाचा शोध सुरू केला आहे. चांचणी म्हणून १०,००० फूट खोलपर्यंत 'बोअर वेल' खणण्यास आरंभ करण्यांत आला आहे. ऑस्ट्रेलिआंत तेलासाठीं मोठ्या प्रमाणावर करण्यांत येणारा हा पहिलाच प्रयत्न आहे.

**अमेरिकेंतील विवाह आणि घटस्फोट**—१९४९ सालीं, अमेरिकेंत १५,८५,००० विवाह झाले आणि ३,८६,००० जोडप्यांनीं घटस्फोट घेतले. विवाहांचें दरहजार लोकसंख्येशीं प्रमाण १०·७ पडतें आणि घटस्फोटांचें २·६ पडतें.


—सर्व प्रांतांतील—
सुती—गरम—रेशमी
—खादीचें माहेरघर—

# खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २.

# अर्थ

बुधवार, ता. १६ एप्रिल, १९५०





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## पेट्रोलियम तेलाची जागतिक वाटणी

उजेडाकरिताच फक्त पूर्वी तेलाचा उपयोग केला जाई; आतां जगाच्या आर्थिक घडामोडींत त्यास अत्यंत महत्त्वाचें स्थान प्राप्त झालें आहे. केरोसीन आणि वंगणाचीं तेलें ह्यांसच चाळीस-पन्नास वर्षांपूर्वी महत्त्व होतें. १८९९ सालीं ग्रेट ब्रिटननें ८,७३,००० टन पेट्रोलियम तेलें आयात केलीं. त्यांपैकीं ७,२५,००० टन केरोसीन होतें आणि उरलेल्या १,४८,००० टनांत वंगणाच्या तेलांचाच भरणा होता. आतां औद्योगिक क्षेत्राची पेट्रोलियम तेलांची मागणी वाढत चालली आहे. जगाच्या पेट्रोलियमच्या पुरवठ्यांत अमेरिकेचा सुमारें ६०% हिस्सा सतत कायम राहिला आहे आणि ब्रिटिश व ब्रिटिश/डच कंपन्यांचें उत्पादन वाढत आहे.

### पेट्रोलियम तेलांचें जागतिक उत्पादन

( आकडे लक्ष मेट्रिक टनांचे आहेत )

| वर्ष | जागतिक उत्पादन | त्यांपैकीं अमेरिकेंतील उत्पादन | ब्रिटिश व ब्रिटिश/डच कंपन्यांचें उत्पादन |
|---|---|---|---|
| १९०० | २०२ | ८५ | ६ |
| १९१० | ४४२ | २७९ | २० |
| १९२० | ९४२ | ५९१ | १२५ |
| १९३० | २,००० | १,२६७ | २९४ |
| १९३८ | २,८०५ | १,७०७ | ४१८ |
| १९४८ | ४,८९० | २,९२५ | ६८० |

अमेरिका देशांतील पेट्रोलियम तेलाच्या यंत्रसामुग्री वगैरेमध्यें ७०० कोटी पौंड किंमतीची मालमत्ता आहे आणि १९३९ अखेर तिनें परदेशांत ह्याच धंद्यांत ५० कोटी पौंड गुंतविलेले होते. गेल्या शंभर वर्षांत अमेरिकेंत सुमारें १२,५०,००० तेलाच्या विहिरी खोदण्यांत आल्या. त्यांपैकीं ४,००,००० विहिरींतून आज प्रत्यक्ष तेल काढण्यांत येत आहे.

ग्रेट ब्रिटनमध्यें तेलाचा पुरवठा फारसा नाहीं. परंतु परदेशांतील तेलाच्या उत्पादनांत मात्र ब्रिटन अग्रेसर आहे. अमेरिका आणि रशिया हे देश वगळले तर त्यांचे बाहेर निघणाऱ्या तेलापैकीं ४०% तेलांत ब्रिटिश हितसंबंध आहेत आणि अमेरिकन व रशियन तेल वगळलें, तर उरलेल्या तेलाच्या ५०% तेलाची विक्री ब्रिटिश व ब्रिटिश/डच कंपन्या करीत आहेत.

पेट्रोलियम तेलाच्या धंद्यांत गुंतलेल्या कांहीं कंपन्या त्या संबंधांतील सर्व कामें करतात तर कांहींचें कार्यक्षेत्र मर्यादित आहे. एकट्या अमेरिकेंत ३४,००० कंपन्या तेलाच्या धंद्यांत आहेत.त्यांतील प्रमुख म्हणजे स्टँडर्ड ऑइल कंपनी ( न्यू जर्सी ). ह्या कंपनीच्या जोडीच्या ब्रिटिश आणि ब्रिटिश/डच कंपन्या म्हणजे अँग्लो-इराणिअन ऑइल कंपनी व रॉयल डच/शेल कंपनी, ह्या होत.

पेट्रोलियमच्या धंद्याचें स्वरूप जागतिक बनलें आहे. पेट्रोल देणाऱ्या कांहीं विहिरी अगदीं अवघड व निर्जन अशा ठिकाणीं आहेत. त्यासाठीं रस्ते, गोद्या, रेल्वे, शहरें, इत्यादि तयार करावीं लागलीं आहेत. एकट्या अमेरिकेंतच तेल वहाण्यासाठीं १,५०,००० मैल नळ टाकण्यांत आले आहेत. नव्यानव्या प्रकारच्या पेट्रोलियमच्या पदार्थांस मागणी येते, त्याच्या उत्पादनासाठीं आगाऊ तयारी करावी लागते. त्याकरितां प्रचंड प्रयोगशाळा चालवाव्या लागतात.

### अतिपूर्वेकडील पेट्रोलियम

अमेरिका, वेनेझुएला, रशिया, मध्यपूर्व, ह्यांच्या मानानें अतिपूर्वेकडील देशांत पेट्रोलियम निघत नाहीं. तथापि, युद्धानंतर आतां त्यांचें उत्पादन हळूहळू वाढत आहे. अतिपूर्वेकडील देशांत पेट्रोलियमच्या वापरामध्यें वाढ होण्यास कितीतरी वाव आहे. चीन आणि भारत ह्या देशांत अद्याप केरोसीनच्या स्वरूपांतच पेट्रोलियमचा मुख्यतः उठाव होतो; तें दिव्यासाठीं वापरण्यांत येतें. दर माणशीं वार्षिक खप दोन गॅलन एवढा होतो; ग्रेट ब्रिटनमध्यें तो ८० गॅलन आणि अमेरिकेंत ५०० गॅलन आहे. ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड येथील उठाव बऱ्यापैकीं आहे. औद्योगीकरण आणि रहाणीच्या दर्जांत वाढ, ह्यामुळें पेट्रोलियमचा खप वाढण्यास सहाजीकच मदत होते.

१९३८ सालीं नेदरलंडस् ईस्ट इंडीजचा ( आतां, युनायटेड स्टेटस् ऑफ इंडोनेशिया ) पेट्रोलियमच्या उत्पादक देशांत पांचवा अनुक्रम लागत असे. ब्रह्मदेश व बोर्निओ ह्यांतूनहि पेट्रोलियमची निर्गत होई. युद्धामुळें पेट्रोलियमच्या धंद्यास बरीच झळ लागली, तरी आतां अतिपूर्वेंतील उत्पादन १९३८ च्या बरोबरीस येऊन ठेपलें आहे. इंडोनेशियांत सुमात्रा हें क्षेत्र पेट्रोलियमच्या उत्पादनाच्या दृष्टीनें जुनें व महत्त्वाचें आहे.

### अतिपूर्वेकडील उत्पादन

( आकडे मेट्रिक टनांचे आहेत )

| | १९४८ | १९३८ |
|---|---|---|
| इंडोनेशिया | ४३,९०,००० | ७४,१०,००० |
| न्यूगिनी | २०,००० | — |
| ब्रिटिश बोर्नियो | २७,९०,००० | ९,१०,००० |
| भारत | २,६०,००० | ३,६०,००० (भारत व पाकिस्तान) |
| पाकिस्तान | ८०,००० | |
| जपान | २,००,००० | ३,५०,००० |
| चीन | ८०,००० | — |
| ब्रह्मदेश | ५०,००० | ११,००,००० |
| एकूण | ७८,७०,००० | १,०१,३०,००० |
| जागतिक उत्पादन | ४८,९०,००,००० | २८,०५,३५,००० |

अतिपूर्वेकडील देशांपैकीं ब्रिटिश बोर्निओमध्यें युद्धापूर्वीपेक्षा आतां पुष्कळच जास्त तेल निघत आहे. अतिपूर्वेंतील देशांत

त्याचा पेट्रोलियमच्या बाबतींत पहिला अनुक्रम लागतो. ब्रह्मदेशांतील तेलाच्या खाणी इरावती नदीच्या खोऱ्यांत आहेत. त्यांचें युद्धकाळांत फारच नुकसान झालें. त्यामुळें त्यांचें उत्पादन अतिशय घटलें आहे.

जगांतील पेट्रोलियमच्या भूगर्भांतील साठ्यापैकीं फक्त २% साठा अतिपूर्वेकडील देशांत आहे. परंतु तो साठा बाहेर काढण्याबाबतींतहि अद्याप फारशी प्रगति झालेली नाहीं. ब्रिटिश आणि डच कंपन्यांनीं पुढाकार घेऊन जी कांहीं प्रगति दिसते, ती केलेली आहे. त्या कंपन्या नव्या क्षेत्रांच्या शोधांत आहेतच.

## हिंदी शिपिंगच्या धंद्याची सरकारी मदतीची मागणी

सिंधिया स्टीम नॅव्हिगेशन कं. लि. चे चेअरमन, श्री. धरमसी एन. खटाव, ह्यांनीं कंपनीच्या ३० व्या वार्षिक साधारण सभेंत भाषण करतांना, हिंदी आगबोट धंद्याच्या परिस्थितीचा आढावा घेतला. ते म्हणाले:—"युद्धकाळांत आणि त्यानंतर कांहीं काळ मालाची मोठ्या प्रमाणावर वहातुक चालू होती, ती आतां थांबली आहे. कांहीं देश नव्यानेंच आगबोट वहातुकीस प्रारंभ करीत आहेत आणि मालवाहू आगबोटींची संख्या वाढली आहे. ब्रिटन, फ्रान्स, इटली, ह्यांनीं युद्धांतलें नुकसान भरून काढलें आहे आणि जपानहि आगबोटी बांधण्यास लवकरच प्रारंभ करूं लागेल. हिंदी किनाऱ्यावरील आगबोट कंपन्या वाढल्या असून त्यांच्या आगबोटींच्या संख्येंतहि भर पडली आहे. परंतु त्या प्रमाणांत मालाची वहातुक वाढलेली नाहीं. हिंद–पाकिस्तान व्यापार स्थगित झाला आहे. ब्रह्मदेशांतून होणारी तांदळाची आयात पूर्ववत होत नाहीं. रुपयाच्या अवमूल्यनामुळें परराष्ट्रीय व्यापाराचा जोम कमी झाला आहे. परंतु, वहातुकीस येणारा खर्च मात्र कमी झालेला नाहीं आणि सध्याचेंच वहातुकीचे दर नुकसानकारक ठरत आहेत. कांहीं वहातुकीचे दर तर खाली जाऊं लागले आहेत. मोठ्या प्रमाणावर आगबोटींची वहातुक चालू ठेवण्याइतका किनाऱ्यावर व्यापारच नाहीं. आगबोटी व आगगाड्या ह्यांच्यामध्यें सहकार्याची योजना अंमलांत आणणें अगत्याचें आहे. उदाहरणार्थ, वाघिणींचा तुटवडा असतांहि कोळशाची वहातूक रेल्वे मार्गानें चालू आहे, ती बंदरा–बंदरांतून आगबोटींतून करतां येईल त्यामुळें आगबोटीच्या धंद्यास सहाय्य होईल. रेल्वे ह्या सरकारी मालकीच्या आहेत, परंतु आगबोट कंपन्यांना तें संरक्षण नाहीं. आगबोट वहातुकीचा धंदा दृढमूल व्हावा, ह्यासाठीं इतर देशांप्रमाणें भारत सरकारनेंहि सढळपणें त्यास मदत केली पाहिजे."

सिंधिया स्टीम नॅव्हिगेशन कं. लि. ला अहवालाचे वर्षी ५८,२८,५१७ रु. नुकसान आलेलें आहे.

## शेठ डालमियांचा सट्टेबाजांना सल्ला

शेठ रामकृष्ण डालमिया ह्यांनीं एक पत्रक काढून, सट्टेबाजीपासून दूर रहाण्याचा त्यांनीं लोकांना सल्ला दिला आहे. "सट्टेबाजांची संख्या वाढत चालली असून त्यांत हजारो लोकांचीं दिवाळीं निघत आहेत. दलालांच्या स्वार्थी हिकमतीस आणि कांहीं शेअर्सच्या कृत्रिम किंमत वाढीस मध्यमवर्गीयांनीं बळी पडून आपलें नुकसान करून घेऊं नये. योग्य ठिकाणींच त्यांनीं आपले पैसे 'गुंतवावेत', सट्टे करूं नयेत" असें शेठ डालमियांनीं सुचविलें आहे.

## पाकिस्तानाची अपेक्षा पुरी झाली नाहीं

पाकिस्ताननें आपल्या रुपयाची किंमत ब्रिटिश पौंड किंवा हिंदी रुपया ह्यांच्याप्रमाणें न उतरविण्याचें ठरविलें. त्याचा हेतु, पाकिस्तानी कच्चा माल म्हणजे ताग, कपास, कातडी, लोकर, इत्यादींच्या निर्गतीस पूर्वीप्रमाणें मागणी राहून, तो माल आयात करणारांस ४४% ज्यास्त किंमत द्यावी लागेल आणि त्यामुळें पाकिस्तानाचा फायदा होईल, असा होता. पाकिस्तानांत आयात होणारा माल ३०% स्वस्त पडेल आणि त्यामुळें रहाणीचा खर्च उतरविता येईल, अशीहि पाकिस्तानाची अपेक्षा होती. अशा रीतीनें, पाकिस्तानाच्या परराष्ट्रीय व्यापारांत अनुकूल तफावत राहील, अशी पाकिस्तानची कल्पना होती. ही कल्पना खरी ठरली असती, तर गेल्या सहा महिन्यांत पाकिस्तानाच्या स्टर्लिंग रोख्यांत ६० कोटी रुपयांची घट होण्याचें कारण नव्हतें. १९ सप्टेंबर १९४९ रोजीं पाकिस्तान १६४·८७ कोटी रुपयांचे स्टर्लिंग रोखे धारण करीत होता; १७ मार्च, १९५० रोजीं त्यांची किंमत १०५·३८ कोटी रुपयांपर्यंत खालीं आली आहे. स्टर्लिंग गटांतील इतर देशांचें अनुकरण न करतां आपलें स्वतंत्र धोरण ठेवण्याचा पाकिस्ताननें आग्रह धरला, तो त्या देशास हितकारक झाला नाहीं असें आकडे सांगतात.

हिंद–पाकिस्तान व्यापारांत खंड पडल्यापासून पाकिस्तानाला आपल्या कोळशासाठीं दक्षिण आफ्रिकेवर अवलंबून रहावें लागत आहे. त्यामुळें त्याला दुप्पट किंमत पडत आहे. वहातुकीचा खर्चहि वाढतो, तो वेगळाच. पाकिस्तान त्याला लागणारें कापड जपान, ब्रिटन, युरोप, येथून आयात करीत आहे आणि हें कापड पुष्कळच महाग पडतें. उलट, पाकिस्तानाची निर्गत मात्र मंदावली आहे, त्यामुळें कोट्यावधि रुपयांचें नुकसान होत आहे. कच्च्या मालाच्या किंमती घटल्या आहेत. भारताला कच्च्या तागासाठीं अडवण्याचा पाकिस्ताननें प्रयत्न केला. त्यामुळें भारतास तागाच्या बाबतींत स्वयंपूर्ण होण्याच्या खटपटीस लागणें क्रमप्राप्त झालें. पाकिस्तानी तागाचा उठाव कमी झाला. त्या कारणानें बरेंच मोठें नुकसान झालें. भारतांतील गिरण्यांची गरज लवकरच स्वदेशी ताग भागवूं शकेल आणि त्यामुळें पाकिस्तानाची ही बाजारपेठ कायमचीच जाईल. सरकी, मीठ, सिमेंट, इत्यादि बाबतींतहि पाकिस्तानची निर्गत बंद पडून त्याचें नुकसान झालें आहे.

## ब्रिटनची परराष्ट्रीय येण्या–देण्यांतील तफावत

१९४७ सालीं ग्रेट ब्रिटनला परराष्ट्रीय येण्या–देण्यांत ६० कोटी पौंडांची तूट आली. १९४८ सालीं तुटीची रक्कम १०३ कोटी पौंड भरली आणि १९४७ सालीं ती ७ कोटी पौंड झाली. अशा रीतीनें, परराष्ट्रीय येण्या–देण्यांतील तफावत कमी होत चालली आहे. १९४९ सालीं आगबोट–वहातुक, व्याज, प्रवाशांचा ब्रिटनमधील खर्च, इत्यादींच्या रूपानें ब्रिटनकडे अप्रत्यक्ष रीतीनें ११ कोटी पौंड दाखल झाले. परंतु व्यापाराच्या आयात-निर्गतींत येण्यापेक्षा देणें १८ कोटी पौंडांनीं ज्यास्त निघालें. म्हणजे, ७ कोटी पौंडांची प्रत्यक्ष तूट अनुभवास आली.

## डनलॉप रबर कंपनी (इंडिया) लि.

वरील कंपनीनें १९४९ सालीं ९,८३,३०,९२७ रुपयांची विक्री करून १,२७,४९,५८३ रुपये निव्वळ नफा मिळविला. १९४७ व १९४८ ह्यावर्षी कंपनीचें भांडवल जेवढें होतें, तें अहवालाचे वर्षी ५०,००,००० रुपयांचे बोनस शेअर्स काढून दुप्पट करण्यांत आलें. त्यामुळें आतां डिव्हिडंडचा दर २०% करण्यांत आला असला तरी भागीदारांना पूर्वीप्रमाणें डिव्हिडंडची रक्कम हातीं प्रत्यक्ष पडणार आहे.

## कंपनी कायदा आणि ऑडिटर

लेखक:—" सरळमार्गी "

हिंदी कंपनी कायद्यांत ज्या सुधारणा सुचविण्यांत आलेल्या आहेत, त्या स्वागतार्ह आहेत. ऑडिटरांवर बरीच जबाबदारी टाकण्यांत आली आहे आणि ती ते पार पाडतील ह्यांत संशय नाहीं.

### ऑडिटरांबाबत सूचना

ऑडिटरांच्या नेमणुकीचे ठरावाचे संबंधांत डायरेक्टर्स व मॅनेजिंग एजंटस ह्यांचेवर निर्बंध सुचविले आहेत, त्यांत बरेंच स्वारस्य आहे. कंपन्यांच्या वार्षिक सभांच्या हजेरीची छाननी केली, तर मॅनेजिंग एजंटांच्या मुठींत असणारे कंपनीचे कांहीं नोकर सभेस उपस्थित असतात असें आढळून येईल. कित्येक वेळां अकौंटंट, मुकादम किंवा फोरमन हाच ऑडिटरच्या नेमणुकीचा ठराव मांडतो! ऑडिटरांची नेमणूक सर्वस्वी मालकवर्गाच्या हातांत असते. सचोटीनें चालणारा आणि स्पष्टवक्ता ऑडिटर ह्याला ही परिस्थिति सहाजिकच आवडत नाहीं. ऑडिटरच्या नेमणुकीमध्यें व त्याचें वेतन ठरविण्यामध्यें मॅनेजिंग एजंट व डायरेक्टर विशेष लक्ष घालीत आहेत असें अल्पसंख्याक भागीदारांना आढळलें, तर त्यांना जॉइंट ऑडिटर सुचवितां यावा. ह्या दुसऱ्या ऑडिटराचे बाबतींत डायरेक्टर व मॅनेजिंग एजंट ह्यांना मत असूं नये. सभेस उपस्थित असणारांपैकीं अल्पसंख्याक भागीदार हा एकटाच मनुष्य असला, तरी त्याला आपला ऑडिटर नेमतां आला पाहिजे.

ऑडिटरांचा रिपोर्ट व त्याचे जागीं दुसऱ्याची नेमणूक केल्यास त्यास तक्रार करण्याचा अधिकार, ह्यासंबंधांतील सुधारणा योग्य अशाच आहेत. निवृत्त होणाऱ्या ऑडिटरला सतत पांच वर्षे काम मिळण्याची शाश्वति असावी. नाहींतर, मॅनेजिंग एजंटस व बोर्ड ह्यांच्या गैरमर्जीमुळें त्यांना काम करणें कठीण जाईल.

ऑडिटरांनीं सही करण्यापूर्वी बोर्डानें ताळेबंद आणि नफातोटा पत्रक ह्यांस मंजुरी दिलेली असली पाहिजे, ही सूचना अंमलांत येणें आवश्यक आहे. नाहींतर, डायरेक्टरांना ह्याव्यास तोंड देण्याचा प्रश्न आला, कीं ऑडिटरनें हीं पत्रकें तयार करून दिलीं असें म्हणून त्याचेवर दोषाचें खापर फोडण्याचा ते प्रयत्न करतात.

जनरल सभांत ऑडिटरांची उपस्थिति, त्यांना सभांची नोटीस मिळण्याचा आणि सभेंत बोलण्याचा अधिकार, ह्या आवश्यक असलेल्या तरतुदी आतां कायद्यांत येत आहेत, हें बरें आहे. खासगी लिमिटेड कंपन्यांचे हिशेबहि लायक ऑडिटरांकरवीं तपासून घेतले पाहिजेत, ही सूचनाहि योग्य आहे. शाखांच्या ऑडिटबद्दलची सुधारणाहि स्वागतार्ह आहे. त्यासाठीं ऑडिटरला फी आणि प्रवासखर्च मिळण्याची कायद्यानेंच तरतूद केल्यामुळें ऑडिटरला शाखांना भेटी देऊन आपलें काम नीट करतां येईल.

ज्या खर्चास ऑडिटरांची मंजुरी नाहीं, ती रक्कम डायरेक्टरांनीं कंपनींत भरली पाहिजे, ही सूचना फारच नामी आहे आणि तिचा कायद्यांत जरूर अंतर्भाव करावा.

### न्याय्य मोबदल्याची शाश्वति पाहिजे

वरील सर्व सूचना अंमलांत आल्या तर चांगल्या ऑडिटरला आपलें काम सूक्ष्मपणें करून दोष भागिदारांच्या व सरकारच्या नजरेस आणण्यास मदत होईल ह्यांत शंका नाहीं. परंतु हें कर्तव्य करीत असतांना ऑडिटरला मॅनेजिंग एजंटर, बोर्ड किंवा भागीदार ह्यांच्यावरच अवलंबून रहावें लागतें. कित्येक वेळां भागीदार ऑडिटराचें वेतन इतकें कमी ठरवितात, कीं त्या फीवर काम करणें ऑडिटरला अशक्य होतें. ऑडिटरानें निष्ठापूर्वक काम केलें तरी कित्येक वेळां त्याला बोर्डावर किंवा मॅनेजिंग डायरेक्टरावर त्याच्या इतर कांहीं कामाच्या वेतनाचे संबंधांत अवलंबून रहावें लागतें व त्यांना खूष करावें लागतें. ऑडिटराच्या वेतनाकडे भागीदारांनीं दुर्लक्ष करूं नये. सच्च्या ऑडिटरवर "माझी फी वाढवा" अशी डायरेक्टरांस विनंति करण्याची पाळी येऊं नये. व्यवस्थापक किंवा अकौंटंट अथवा सभेस उपस्थित असणारे भागीदार ह्यांच्या मर्जीवर ऑडिटराची फी अवलंबून राहूं नये. सॉलिसिटरांच्या फी प्रमाणें ऑडिटरांची फी सुद्धा सरकारनें ठरवून द्यावी. ह्या शेड्यूलप्रमाणें ठरलेल्या फीचें बिल पाठविण्यांत आलें, कीं कंपनीनें तें पूर्णपणें भागविलें पाहिजे; डायरेक्टरांना किंवा इतरांना त्यांत धांवा काढणें अशक्य झालें पाहिजे. कित्येक कंपन्यांचे डायरेक्टर कंपनीच्या कामासाठीं फर्स्ट क्लासनें किंवा विमानानें प्रवास करीत असले तरी ऑडिटर व त्याचा नोकरवर्ग ह्यांच्या सेकंड क्लासच्या प्रवासखर्चासहि ते आक्षेप घेतात, असा कटु अनुभव कांहीं कंपन्यांत येतो. शेअर होल्डर्सपुढेंहि ह्या खर्चाचीं बिलें मांडून दाद मागतां येत नाहीं. अशा गोष्टी घडल्यावर, जबाबदारीनें वागणाऱ्या ऑडिटरास मनस्ताप झाल्याविना रहाणार नाहीं. त्यामुळें ऑडिटचे कामास आवश्यक असलेली शांति व ताजेपणा कसा टिकणार?

ऑडिटर ऑडिटचे कामाबरोबर इनकम टॅक्सचें काम, कायदेशीर सल्ला, इत्यादि कामेंहि करीत असतो. त्याचा मोबदलाहि शेड्यूलनें ठरवून देण्यांत यावा आणि त्याचीं बिलें तात्काळ देणें कंपनीवर बंधनकारक असावें. हीं बिलें बरोबर नाहींत किंवा आकारणी जादा आहे, असें कंपनीस वाटलें तर तिला कोर्टाकडे जातां येईलच. परंतु, सरळपणें काम करणाऱ्या ऑडिटराला आपल्या योग्य कामाच्या न्याय्य मोबदल्यासाठीं खाली पहाण्याची पाळी येता कामा नये. त्याचप्रमाणें, मॅनेजिंग एजंट जेव्हां ऑडिटरला काढून टाकतात, तेव्हां निवृत्त होणाऱ्या ऑडिटरची बाकी चुकती करण्याची त्यांनीं खबरदारी घेतली पाहिजे.

---

## रिजनल ट्रॅन्सपोर्ट ॲथॉरिटीविरुद्ध हायकोर्टांत अर्ज

नॉर्थ डेक्कन ट्रॅन्सपोर्ट लि. ही कंपनी नाशिक जिल्ह्यांत उतारूंची बस सर्व्हिस चालवित असे. जून १९४१ मध्यें त्या कंपनीला पांच वर्षें मुदतीचा परमिट मिळाला, त्याची मुदत २६ ऑगष्ट १९४६ रोजीं संपली. कंपनीनें हा परमिट रिन्यू करण्याचा अर्ज केला. परंतु तो नाकारण्यांत आला. कंपनीला तात्पुरते परमिट मिळत गेले, त्यांतील शेवटच्याची मुदत ३१ मार्च, १९५० रोजीं संपत होती.

बॉंबे स्टेट रोड ट्रॅन्सपोर्ट कॉर्पोरेशननें परमिटसाठीं अर्ज केला आहे तो मंजूर झाल्यास नॉर्थ डेक्कन ट्रॅन्सपोर्ट कंपनीला आपला धंदा पूर्ववत् करतां येणार नाहीं. म्हणून, कंपनीनें मुंबई हायकोर्टाकडे मुंबई राज्य व रिजनल ट्रॅन्सपोर्ट ॲथॉरिटी (नॉर्थ डेक्कन रिजन) ह्यांचे विरुद्ध अर्ज करून न्याय मागितला.

"अर्जदार कंपनीला परमिट द्यावा, का बॉंबे स्टेट रोड ट्रॅन्सपोर्ट कॉर्पोरेशनला परमिट द्यावा, हा प्रश्न त्याच्या योग्यायोग्यतेप्रमाणेंच ठरविला पाहिजे आणि ही बाब रिजनल ट्रॅन्सपोर्ट ॲथॉरिटीच्या अधिकारांतील असून, कायद्यास धरूनच ॲथॉरिटी वागेल असें गृहीत धरलें पाहिजे' असा हायकोर्टानें निवाडा केला. कंपनीच्या अर्जाचा विचार करण्याची अद्याप वेळ आलेलीच नाहीं, असें हायकोर्टानें सांगितलें.

**चिरमुले सत्कार समारंभाच्या निमित्तानें**

## सातारा स्वदेशी कमर्शियल कंपनी, लि.

### श्री. चिरमुले ह्यांचें मार्गदर्शनः खरेदी-विक्रींतून सराफीस प्रारंभ

१९०६–१९०७ या सालीं वंगभंगानिमित्त हिंदुस्थानांतील राष्ट्रीय वृत्तीच्या लोकांनीं परदेशी मालावरील बहिष्काराची चळवळ जोरांत सुरू केली. स्वदेशी माल माफक दरांत व सतत कसा मिळत राहील, या प्रश्नाचें जणू काय उत्तरच म्हणून साताऱ्यांतील उत्साही नागरिकांनीं "दि सातारा स्वदेशी व्यापारी मंडळी" या नांवाचें दुकान शके १८२८ चैत्र शु॥ प्रतिपदेस स्थापन केलें. दुकान स्थापनेचा उद्देश म्हणून 'खात्रीचा स्वदेशी माल बेताच्या किंमतींत लहान थोर सर्वांस योग्य ठराविक दरानें मिळावा" असें जाहीर केलें होतें.

शके १८२८ मध्यें पाडव्याचे मुहूर्तावर स्थापन झालेल्या या दुकानाचें रूपांतर ता. २०–८–१९०७ रोजीं लिमिटेड कंपनींत झालें. पहिल्या पंधरा महिन्यांतच कंपनीनें रु. १६०००।—ची साखर व रु. ९०००।—चें कापड विकलें, व खर्च वगैरे वजा जातां रु. ४५५।— फायदा मिळविला.

आस्ते आस्ते स्वदेशी माल साताऱ्यांत इतरत्र मिळूं लागल्यानें स्वदेशी मालाची माफक दरांतील खरेदीविक्री ही कंपनीची मूळ अंगें पुढें तिनें बंद करून सराफीचें उपांग वाढवून दुकानाचें रूपांतर बँकेंत केलें. सुरवातीपासून सप्टेंबर १९४९ पर्यंत श्री. अण्णासाहेब चिरमुले यांनींच या संस्थेचें अध्यक्षपद गौरविलें आहे. प्रथम सकाळीं व दुपारीं अशा दोन्ही वेळां व कालांतरानें फक्त दुपारीं असे कंपनीचे कचेरींत बिनचूक येऊन त्यांनीं माल कोठून व कसा मागवावयाचा, खरेदी केलेल्या मालाची विभागणी, मालाच्या मूळ किंमतीवर ठराविक नफा घेऊन त्याचा विक्रीचा दर चिट्ठीवर ( लेबल ) उतरवून तो मालावर लावणें, एकहि पैसा वाया जाणार नाहीं याबद्दल निरंतर दक्ष असणें, उधारी वाढवूं न देणें व झालेली उधारी वसूल करणें, हिशेब व्यवस्थितपणें लिहिले गेले आहेत किंवा कसे, वगैरे दुकानच्या दैनंदिन कामावरची देखरेख अगदीं वक्तशीरपणें व आपुलकीनें केली आहे. पुढें जसजसा सराफीचा धंदा वाढूं लागला तसतसें या धंद्याबद्दलच्या विशिष्ट जबाबदाऱ्या काय आहेत याचा त्यांनीं बारकाईनें अभ्यास करून या धंद्यांतसुद्धां भागिदार व ठेवीदार या दोघांचेहि दृष्टीनें भरभक्कमपणा कसा येईल इकडे लक्ष दिलें आहे.

शेअर भांडवल व ठेवींची रक्कम व्यापारी मालांत जरूरीपुरती गुंतवूनसुद्धां कांहीं रक्कम शिल्लक पडूं लागली. या रकमेचा उपयोग हुंड्या, चेक्स वगैरे काढणें व वटवणें यांत करून कंपनीनें सराफीच्या ( बँकिंग ) कामास सुरवात केली. सुरवातीचे पंधरा महिन्यांत कंपनीकडे रु. ३५६०।— पर्यंत ठेवी होत्या. या लहान प्रमाणांत ठेवींची सुरवात होऊन त्या जास्तींत जास्त अशा सन १९४९ अखेर अदमासें रु. ४६,००,०००।— पर्यंत वाढलेल्या आहेत.

कंपनीनें सन १९३१ सालीं कराड येथें, १९४५ सालीं ओगलेवाडी येथें व सन १९४६ मध्यें मसूर येथें आपल्या शाखा स्थापन कामाचा व्याप वाढविला आहे.


सतत ४३ वर्षे या कंपनीचा भार श्री. अण्णासाहेब यांनीं निरलसपणें व निस्वार्थ बुद्धीनें सोसलेला आहे. बँकिंग कंपनीचे नवीन कायद्याप्रमाणें ते कंपनींतून निवृत्त झाले असले तरी अजूनसुद्धां कंपनीच्या कारभारावर त्यांचें पूर्वीसारखेंच लक्ष आहे. त्यांनीं घालून दिलेल्या चाकोरींतूनच बँकेचें सध्याचें बोर्ड काम करीत आहे. त्यांचा सल्ला या पुढेंही असाच सर्वांना मिळत राहो व त्यांना परमेश्वर पुरेपुर आयुष्य व आरोग्य देवो.

बँकेची आजची सुस्थिति खालील आकडे दर्शवितेः—

| | | |
|---|---|---|
| विक्री झालेलें भांडवल | रु. | ५,००,००० |
| वसूल झालेलें „ | „ | २,३५,६७० |
| रिझर्व्ह फंडस् वगैरे | „ | ९५,६६२–८–० |
| एकूण खेळतें भांडवल | „ | ५०,००,००० |

**कर्जाच्या रकमेंत कपात**—दामोदर नदीवरील धरणांच्या योजनेंतील भाकरा वीज–निर्मिती केंद्रासाठीं इंटर नॅशनल बँकेकडून २,५०,००,००० डॉलर्स कर्ज मिळणार होतें. परंतु बँकेनें ही रकम कमी करून १,८५,००,००० डॉलर्सच देण्याचें ठरविलें आहे असें समजतें. धरणासाठी लागणारी कांहीं यंत्रसामुग्री पौंडाच्या कक्षेंतील देशांत मिळण्यासारखी असल्यामुळें डॉलर सारखें दुर्लभ चलन वांचविण्याच्या हेतूनें वरील कपात करण्यांत आली आहे.

**हिंदी संशोधकाचें निधन**—डॉ. वामन रामचंद्र कोकटणूर हे भारतीय संशोधक न्यूयॉर्क येथें, आपल्या वयाच्या ६३ व्या वर्षी निधन पावले. त्यांनीं रसायन शास्त्रांतील ३० शोधांची पेटंटस् अमेरिकेंत मिळविलीं होती. पुण्याच्या रानडे इंडस्ट्रिअल रिसर्च इन्स्टिटच्यूटमध्यें त्यांनीं कांहीं दिवस काम केलें होतें. रशिआच्या पंचवार्षिक योजनेंत एक तज्ज्ञ म्हणून त्यांनीं भाग घेतला होता. १९२१ सालीं ते अमेरिकेचे नागरिक झाले. त्यांचा विवाह एका अमेरिकन महिलेशीं झाला होता.



## चिरमुले सत्कार समारंभाच्या निमित्तानें

## सातारा स्वदेशी कमर्शियल कंपनी, लि.

### श्री. चिरमुले ह्यांचें मार्गदर्शनः खरेदी-विक्रींतून सराफीस प्रारंभ

१९०६–१९०७ या सालीं वंगभंगानिमित्त हिंदुस्थानांतील राष्ट्रीय वृत्तीच्या लोकांनीं परदेशी मालावरील बहिष्काराची चळवळ जोरांत सुरू केली. स्वदेशी माल माफक दरांत व सतत कसा मिळत राहील, या प्रश्नाचें जणू काय उत्तरच म्हणून साताऱ्यांतील उत्साही नागरिकांनीं "दि सातारा स्वदेशी व्यापारी मंडळी" या नांवाचें दुकान शके १८२८ चैत्र शु॥ प्रतिपदेस स्थापन केलें. दुकान स्थापनेचा उद्देश म्हणून 'खात्रीचा स्वदेशी माल बेताच्या किंमतींत लहान थोर सर्वांस योग्य ठराविक दरानें मिळावा" असें जाहीर केलें होतें.

शके १८२८ मध्यें पाडव्याचे मुहूर्तावर स्थापन झालेल्या या दुकानाचें रूपांतर ता. २०–८–१९०७ रोजीं लिमिटेड कंपनींत झालें. पहिल्या पंधरा महिन्यांतच कंपनीनें रु. १६०००।—ची साखर व रु. ९०००।—चें कापड विकलें, व खर्च वगैरे वजा जातां रु. ९५५।— फायदा मिळविला.

आस्ते आस्ते स्वदेशी माल साताऱ्यांत इतरत्र मिळूं लागल्यानें स्वदेशी मालाची माफक दरांतील खरेदीविक्री ही कंपनीची मूळ अंगें पुढें तिनें बंद करून सराफीचें उपांग वाढवून दुकानाचें रूपांतर बँकेंत केलें. सुरवातीपासून सप्टेंबर १९४९ पर्यंत श्री. अण्णासाहेब चिरमुले यांनींच या संस्थेचें अध्यक्षपद गौरविलें आहे. प्रथम सकाळीं व दुपारीं अशा दोन्ही वेळां व कालांतरानें फक्त दुपारीं असे कंपनीचे कचेरींत बिनचूक येऊन त्यांनीं माल कोठून व कसा मागवावयाचा, खरेदी केलेल्या मालाची विभागणी, मालाच्या मूळ किंमतीवर ठराविक नफा घेऊन त्याचा विक्रीचा दर चिठ्ठीवर ( लेबल ) उतरवून तो मालावर लावणें, एकहि पैसा वाया जाणार नाहीं याबद्दल निरंतर दक्ष असणें, उधारी वाढवूं न देणें व झालेली उधारी वसूल करणें, हिशेब व्यवस्थितपणें लिहिले गेले आहेत किंवा कसे, वगैरे दुकानच्या दैनंदिन कामावरची देखरेख अगदीं बारकाईनें व आपुलकीनें केली आहे. पुढें जसजसा सराफीचा धंदा वाढूं लागला तसतसें या धंद्याबद्दलच्या विशिष्ट जबाबदाऱ्या काय आहेत याचा त्यांनीं बारकाईनें अभ्यास करून या धंद्यांतसुद्धां भागिदार व ठेवीदार या दोघांचेहि दृष्टीनें भरभक्कमपणा कसा येईल इकडे लक्ष दिलें आहे.

शेअर भांडवल व ठेवींची रक्कम व्यापारी मालांत जरूरीपुरती गुंतवूनसुद्धां कांहीं रक्कम शिल्लक पडूं लागली. या रकमेचा उपयोग हुंड्या, चेक्स वगैरे काढणें व वटवणें यांत करून कंपनीनें सराफीच्या ( बँकिंग ) कामास सुरवात केली. सुरवातीचे पंधरा महिन्यांत कंपनीकडे रु. २५३०।— पर्यंत ठेवी होत्या. या लहान प्रमाणांत ठेवींची सुरवात होऊन त्या जास्तींत जास्त अशा सन १९४९ अखेर अदमासें रु. ४६,००,०००।— पर्यंत वाढलेल्या आहेत.

कंपनीनें सन १९३१ सालीं कराड येथें, १९४५ सालीं ओगलेवाडी येथें व सन १९४६ मध्यें मसूर येथें आपल्या शाखा स्थापन कामाचा व्याप वाढविला आहे.


सतत ४३ वर्षें या कंपनीचा भार श्री. अण्णासाहेब यांनीं निरलसपणें व निस्वार्थ बुद्धीनें सोसलेला आहे. बँकिंग कंपनीचे नवीन कायद्याप्रमाणें ते कंपनींतून निवृत्त झाले असले तरी अजूनसुद्धां कंपनीच्या कारभारावर त्यांचें पूर्वीसारखेंच लक्ष आहे. त्यांनीं घालून दिलेल्या चाकोरींतूनच बँकेचें सध्याचें बोर्ड काम करीत आहे. त्यांचा सल्ला या पुढेंही असाच सर्वांना मिळत राहो व त्यांना परमेश्वर पुरेपुर आयुष्य व आरोग्य देवो.

बँकेची आजची सुस्थिति खालील आकडे दर्शवितात:—

| | |
|---|---|
| विक्री झालेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल झालेलें ,, | ,, २,३५,६७० |
| रिझर्व्ह फंड्स वगैरे | ,, ९५,६६२–८–० |
| एकूण खेळतें भांडवल | ,, ५०,००,००० |

**कर्जाच्या रकमेंत कपात**—दामोदर नदीवरील धरणांच्या योजनेंतील भाकरा वीज-निर्मिती केंद्रासाठीं इंटर नॅशनल बँकेकडून २,५०,००,००० डॉलर्स कर्ज मिळणार होतें. परंतु बँकेनें ही रक्कम कमी करून १,८५,००,००० डॉलर्सच देण्याचें ठरविलें आहे असें समजतें. धरणासाठी लागणारी कांहीं यंत्रसामुग्री पौंडाच्या कक्षेंतील देशांत मिळण्यासारखी असल्यामुळें डॉलर सारखें दुर्लभ चलन वांचविण्याच्या हेतूनें वरील कपात करण्यांत आली आहे.

**हिंदी संशोधकाचें निधन**—डॉ. वामन रामचंद्र कोकटणूर हे भारतीय संशोधक न्यूयॉर्क येथें, आपल्या वयाच्या ६३ व्या वर्षी निधन पावले. त्यांनीं रसायन शास्त्रांतील ३० शोधांचीं पेटंट्स अमेरिकेंत मिळविलीं होतीं. पुण्याच्या रानडे इंडस्ट्रिअल रिसर्च इन्स्टिटयूटमध्यें त्यांनीं कांहीं दिवस काम केलें होतें. रशिआच्या पंचवार्षिक योजनेंत एक तज्ज्ञ म्हणून त्यांनीं भाग घेतला होता. १९२१ सालीं ते अमेरिकेचे नागरिक झाले. त्यांचा विवाह एका अमेरिकन महिलेशीं झाला होता.



## राष्ट्रीय धोरण ठरवितांना सर्वसाधारण जमाबंदीच्या धोरणाचें महत्त्व

( भा. म. काळे )

गेलीं कांहीं वर्षे, सुधारलेल्या राष्ट्रांच्या एकंदर धोरणाच्या बाबतींत जमाबंदीचें स्वरूप कसें असावें त्या प्रश्नाला विशेष महत्त्व आलें आहे. करांची वसुली व जमा झालेल्या पैशाचा विनियोग यांचा अंतिम परिणाम देशाच्या आर्थिक व्यवहारांवर विशेष रीतीनें परिणामकारक होत असतो. 'कागदी चलन' व 'क्रेडिट' ह्या गोष्टींच्या योगानें गेल्या १५० वर्षांत अर्थव्यवहाराला कसें वळण लागलं आहे, व ह्या गोष्टींच्या योग्य उपयोगानें राष्ट्राच्या आर्थिक जीवनांतल्या किती गोष्टी यशस्वी रीतीनें पार पाडल्या जाऊं शकतात हें अगदीं स्पष्ट आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या काळांत सक्तीच्या बचतीचा कांहीं प्रमाणांत उपयोग केला गेला व तो यशस्वी ठरला. दुष्काळाच्या काळांत मोठीं बांधकामें सुरू करून, कांहीं लोकांना उत्पन्नाचें साधन निर्माण झाल्यामुळें, आर्थिक परिस्थिति आटोक्यांत आणली जाते. गिरणी कामगारांच्या बोनसची रक्कम अंशतः सेव्हिंग सर्टिफिकेट्सच्या रूपांत देण्याचा उद्देशहि समाजांतील एका वर्गाच्या हातांत येणारा कांहीं पैसा त्याचा उपयोग लांबणीवर टाकून, मध्यंतरीच्या काळांत तोच पैसा राष्ट्रीय कार्यासाठीं उपयोगांत आणतां यावा हा असतो. ह्या उदाहरणांवरून कर-योजना व खर्च यांचा उद्देश उत्पादनाच्या परिस्थितींत सुधारणा करणें हा असतो हें दिसून येतें. प्रसिद्ध इंग्लिश अर्थशास्त्रज्ञ मरहूम लॉर्ड कीन्स् ह्यांनींहि देशांतील लोकांच्या उत्पन्नाचा परिणाम एकंदर खर्च व पैसा गुंतविण्याच्या गोष्टी यांवर कसा होतो हें आपल्या लिखाणांत विशेष रीतीनें दाखवून दिलें आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या काळांत इंग्लंडच्या युद्ध खर्चावर लॉर्ड कीन्स् यांच्या विचारसरणीचा परिणाम दिसून येतो.

ऑक्सफर्डच्या मिसेस हिक्स् यांनीं नुकतेंच दिल्ली स्कूल ऑफ एकॉनॉमिक्स्च्या वतीनें याच विषयावर उद्बोधक व्याख्यान दिलें. मिसेस् हिक्स यांनीं असें सांगितलें कीं १९३० ते ४० च्या दरम्यान स्वीडन देशानें राष्ट्रीय जमाखर्चाला विशेष प्रकारें वळण लावलें. स्वीडननें अंदाजपत्रकांना राष्ट्रीय धोरणाला वळण लावण्याचा दृष्टीनें विशिष्ट वळण लावलें. सार्वजनिक कामांतील तेजीमंदीला यामुळें तोंड देण्याचा प्रयत्न करण्यांत आला, व पैसा गुंतविण्याच्या दीर्घकालीन धोरणामुळें राष्ट्रीय जीवनाचा आधार जास्त भक्कम करण्यांत आला. कापद्धतीमुळें देशाच्या अर्थ व्यवहाराला मजबूत वळण लावतां येतें, व ही दृष्टि शांततेच्या सामान्य काळांतहि ठेवली पाहिजे. वाढत जाणारे उत्पन्नावरील कर हे सुधारलेल्या देशांच्या अर्थव्यवस्थेचे शांततकालीन महत्त्वाचे मार्ग म्हणून रूढ झाले आहेत. ज्याप्रमाणें एखाद्या व्यापारी कंपनीच्या जमाखर्चाचे आंकडे त्या कंपनीच्या एकंदर परिस्थितीवर लख्ख प्रकाश टाकतात, त्याचप्रमाणें देशाच्या जमाखर्चाच्या आंकड्यावरून त्या देशांत संपत्तीचें उत्पादन कसें होतें, पैसा विशेषतः कोणत्या गोष्टींवर कसा खर्च केला जातो, देशांतील पैशाची बचत व भांडवल कसें गुंतविलें जात आहे इ. गोष्टींची स्पष्ट कल्पना करतां आली पाहिजे. जमाखर्चांमध्यें अशी दृष्टि ठेवावयाची म्हणजे खर्चावर कायदेमंडळानें व सरकारी अधिकाऱ्यांनीं बारकाईनें लक्ष ठेविलें पाहिजे असेंहि मिसेस हिक्स यांनीं सुचविलें.

---


# दि बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

९ बेक हाऊस लेन, कोट, मुंबई, स्थापन साल १९११

चेअरमनः-श्री. आर. जी. सरैय्या, ओ. बी. ई.

| | |
|---|---|
| भागांचें भांडवल | रु. ३०,९१,००० |
| गंगाजळी व इतर निधी | रु. ३०,९७,८०० |
| ठेवी | रु. ७,२२,४२,००० |
| खेळतें भांडवल | रु. ९,२०,५०,००० |

### १३ जिल्ह्यांत ५७ शाखा

हिंदी संघामधील महत्त्वाच्या शहरांमधून हुंड्या, बिलें वगैरे वसूल केलीं जातात. वेगवेगळ्या प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. त्यांच्या शर्तींबद्दल चौकशी करावी.

व्ही. पी. वर्दे
ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर.



# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर ( बेलापूर रोड ), ओझर ( जि. नाशिक )

पे-ऑफिसः—खोपोली ( जि. कुलाबा )

श्री. बी. बी. वाळवेकर ( अध्यक्ष ) | श्री. के. पी. जोशी ( उपाध्यक्ष )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ३,९८,२८५ |

### एकूण खेळतें भांडवल ५३ लाखांचे वर

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर.

## सिमेंट पुरवठ्याच्या परिस्थितींत सुधारणा

### विक्रीवरील निर्बंध सैल केले

मुंबई राज्यांतील सिमेंट पुरवठ्याच्या परिस्थितींत सुधारणा झाल्यामुळें मुंबई सरकारनें अधिकृत स्टॉकिस्टांमार्फत करण्यांत येणाऱ्या सिमेंटच्या विक्रीवरील निर्बंध आणखी सैल केले आहेत. आता सदरहू स्टॉकिस्टांना दरमहा दरडोई परवान्याशिवाय एक टन (म्हणजेच २० पोती) जास्तींत जास्त न विकल्या गेलेल्या साठ्याच्या ७५ टक्क्यापर्यंत-सिमेंट विकता येईल. जवळचा साठा खुल्या विक्रीस काढण्यापूर्वी स्टॉकिस्टांनीं योग्य त्या अधिकाऱ्यांनीं दिलेल्या परवान्यावर व अधिकारपत्रावर सिमेंट दिलेंच पाहिजे असें त्यांच्यावर बंधन आहे.

तातडीच्या व आवश्यक अशा बिगर-शेतकी कामासाठीं लागणारे सिमेंट जवळच्या महसूल अधिकाऱ्यांकडून म्हणजे मामलेदार आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून देण्यांत येतें. या सिमेंटचें प्रमाण वाढवून तीन टनांचें म्हणजे ६० पोत्यांचें १० टन म्हणजे २०० पोतीं करण्यांत आलें आहे. अर्जदारानें कोणत्या कारणासाठी सिमेंट लागावयाचें आहे आणि तें कारण खरेखुरें असून त्याशिवाय इतर कारणांसाठीं तें वापरलें जाणार नाहीं अशा अर्जाचें निवेदन त्यावर स्वतःची सही करून महसूल अधिकाऱ्यांना सादर करण्याची आवश्यकता आहे.

### रिझर्व्ह बँक कायद्यांत दुरुस्ती

रिझर्व्ह बँक कायद्यांत दुरुस्ती करणारें एक बिल अर्थमंत्री डॉ. मथाई ह्यांनीं पार्लमेंटांत गेल्या आठवड्यांत मांडलें. शेती आणि सहकार ह्या क्षेत्रांतील बँकेच्या उत्पादक कर्जाची मुदत वाढविणें आवश्यक झालें आहे. शेड्यूल्ड बँका साप्ताहिक तक्ते भरून पाठवितात, त्यांतील तपशील वाढविणें जरूर भासत आहे. किमान रोख रकमा बाळगण्याचें शेड्यूल्ड बँकांवर जें बंधन आहे, तें बँकांच्या आवाक्याबाहेरील अडचणींचे वेळीं सैल करण्याचा अधिकार बँकेस असणें इष्ट वाटूं लागलें आहे. ह्या सुधारणा प्रस्तुत बिल घडवून आणणार आहे.

### माजी व्हाइसरॉयला दंड

हिंदुस्थानचे माजी व्हाइसरॉय लॉर्ड हॅलिफॅक्स, ह्यांना यॉर्कशायर पोलीस कोर्टात, गेल्या आठवड्यांत, निष्काळजीपणानें मोटार हाकल्याबद्दल १० पौंड दंड झाला. ओळीनें तीन रात्रीं महत्त्वाच्या समारंभांस हजर राहिल्यानें त्यांच्या डोळ्यावर झोप येऊन त्यांची गाडी रस्त्याच्या कडेच्या झाडावर आपटली. ते स्वतः गाडी चालवीत होते; लेडी हॅलिफॅक्स व ड्रायव्हर हे उतारू होते. लॉर्डसाहेबांच्या लायसेन्सवर शेरा मारण्यांत आला आहे.

### भारत-पाकिस्तान व्यापारी करार

३१ जुलै १९५० पर्यंतच्या मुदतीचा भारत-पाकिस्तान व्यापारी करार झाला आहे. त्या अन्वयें पाकिस्तान ८ लक्ष गाठी ताग देणार आहे. त्याच्या बदली भारतानें तागाचा तयार माल, पोलाद, कापड, इत्यादि पुरविण्याचें आहे.

### बँक ऑफ इंडियाची टोकिओ शाखा

दि बँक ऑफ इंडिया लि. ची टोकिओ (जपान) शाखा १ मे, १९५० पासून सुरू होणार आहे.


**दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.**

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉम्पेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

**दि मोटार ओनर्स म्युच्युअल इन्शुअरन्स कं. लि. (बेळगांव)**

पुणें शाखा:—९७४ सदाशिव, लक्ष्मी रोड.

मोटार मालकांनींच स्थापन केलेली, मोटारीचा विमा उतरणारी, मोटार मालकांचंच संचालक मंडळ असलेली व विमेदारांना हक्कानें शेअर्स देण्याची योजना आखणारी अखिल भारतांतील पहिलीच संस्था. प्रीमियमचे दर अत्यंत माफक व शिवाय अनेक सवलती. —एजन्सी व इतर माहितीकरितां चौकशी करा.— ब्रँच सेक्रेटरी

**दि सेन्ट्रल म्युच्युअल विमा कंपनी, लिमिटेड**

हेड ऑफिसः—६७, अपोलो स्ट्रीट, सोनावाला बिल्डिंग, मुंबई.

★ नव्या कामाचे मोठे आकडे हेंच केवळ विमा कंपनीच्या यशाचें खरें गमक नव्हे. विमेदारांची योग्य निवड, काटकसरीची शास्त्रशुद्ध पण चोख व्यवस्था याचीच या धंद्यास खरी जरूरी आहे. आमचा कारभार वरील तत्त्वानुसारच चालतो, याची आजच खात्री करून घ्या.

शं. न. आगाशे, मॅनेजिंग डायरेक्टर.

**बेडेकर पापड** वापरा.

**सारस्वत को-ऑपरेटीव्ह बँक लि.**

स्थापना १९१८

सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४

सब ऑफिस : १ दादर, २ माहीम

शाखा : मार्केट, बेळगांव

अध्यक्ष : या. पुं. वर्दे, बी. कॉम्.

सेक्रेटरी : शं. त्रि. संझगिरी, बी. कॉम्.

एकूण खेळतें भांडवल रु. १ कोटीवर




हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.